BC-2 3001


महाराष्ट्र शासनगृह विभाग
पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे.
पुणे रेल्वे स्टेशन, मेन गेट जवळ, पुणे. पिन कमांक 411001
दुरध्वनी कमांक – 020 26129398
ई मेल –ps.pune.prly@mahapolice.gov.in


पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे कडील जा. क्र. 3458/२०२५ पुणे दिनांक १३/०३/२०२५

# प्रेसनोट

दि १३/०३/२०२५

फिर्यादी नामे शिरीष विठ्ठलराव शितोळे वय ७३ वर्ष धंदा रिटायर्ड राह.७८ आनंदपुरा हैबतराव मार्ग देवारा मध्यप्रदेश मो.नं ८५१६०३९९०२,९८९३१२२३५४ हे दि १३/०१/२०२५ रोजी १६:५६ वा गाडी नं २२९४४ इंदौर दौंड एक्सप्रेस गाडीचे बोगी नं ए बी/२ बर्थ नं ६५,६८ वरून प्रवास करीत असतांना, पुणे रेल्वे स्टेशन जवळ आल्यानंतर चार अज्ञात इसम येवुन बॅग उतवरण्यास मदत करतो अशी दिशाभुल करत असताना फिर्यादी यांनी पाहीले कि त्यांची ट्रॅली बॅगेची चैन उघडल्याचे दिसल्याने त्यांनी बॅग जवळ जावुन पाहिले असता, त्यांच्या बॅगेतील एकुण ११,२८,१५०/–रू किमतीचे सोन्याचे व चांदीचे दागिने ठेवलेली पर्स कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांची दिशाभुल करून मुद्दाम लबाडीने चोरून नेलेबाबत त्यांना खात्री झाली झाल्याने त्यांनी पुणे लोहमार्ग पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्याने गु र नं १३/२०२५ कलम ३०५(सी), ३(५) भा.न्या.सं. गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्हयांच्या तपासाच्या अनुषंगाने पुणे लोहमार्ग पोलीस ठाणेकडील सर्व्हेलन्स पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांची तपास पथके तयार करण्यात आली गुन्हयाच्या तपासात जवळपास सुमारे १५० ठिकाणाचे सीसीटीव्ही फुटेज बारकाईने तपासण्यात आले सीसीटीव्ही फुटेजमधील संशयीत इसमाच्या हालचाली वरून आरोपी निष्पण करून त्याचे फोटो प्राप्त करून घेण्यात आले. सदर फोटोच्या आधारे गुप्त बातमीदारामार्फत तपास करविला असता गुन्हयातील दागिने चोरणारा आरोपी नामे सुमितकुमार सतविरसिंह वय ३० वर्षे राहणार ई ७/१२६ सुलतानपुरी सनी बाजार रोड दिल्ली मुळ गाव जाटलुहारी ता भवानीखेडा जि भिवानी राज्य हरियाणा हा रेल्वे यार्ड घोरपडी येथे असल्याची माहिती मिळाली. त्यांनतर रेल्वे यार्ड घोरपडी येथे जावुन सापळा रचुन त्यास शिताफीने पकडुन ताब्यात घेतले व त्यास विश्वासात घेवुन विचारपुस केली असता सदर गुन्हयांतील दागिने त्यानेच चोरले असल्याचे सांगितल्याने त्यास नमुद गुन्हयात दि २४/०१/२०२५ रोजी १७:२० वा अटक करून त्यांच्याकडुन १०,८३,४००/– रू कि गुन्हयातील चोरीस गेलेले सोन्याचे व चांदीचे दागिने जप्त करून गुन्हयांची उकल करण्यात आली आहे तसेच जप्त केलेले दागिने न्यायालयीन प्रकियेव्दारे फिर्यादी यांना परत देण्यात आले आहेत त्यामुळे गुन्हयांतील फिर्यादी यांनी श्री तुषार दोषी, मा पोलीस अधीक्षक लोहमार्ग पुणे, श्री रोहिदास पवार, अपर पोलीस अधीक्षक सो लोहमार्ग पुणे, श्री बिपीन हसबनिस, उपविभागीय पोलीस अधिकारी लोहमार्ग पुणे विभाग, श्री प्रमोद खोपीकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे यांचे तसेच तपास पथकाचे कौतुक व अभिनंदन केले आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी हि श्री तुषार दोषी, मा पोलीस अधीक्षक लोहमार्ग पुणे, श्री रोहिदास पवार, अपर पोलीस अधीक्षक सो लोहमार्ग पुणे, श्री बिपीन हसबनिस, उपविभागीय पोलीस अधिकारी लोहमार्ग पुणे विभाग, यांचे मार्गदर्शनानुसार श्री प्रमोद खोपीकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे, पोलीस उपनिरीक्षक – श्री यशवंत साळुंके, पोलीस हवालदार – १०५१ कदम, पोलीस हवालदार ९४५ टेके, पोलीस हवालदार १२६१ दांगट, पोलीस हवालदार ११२२ कांबळे, पोलीस हवालदार ५७ बिडकर, पोलीस अंमलदार ११५ केन्द्रे, पोलीस अंमलदार २०२ मधे, पोलीस अंमलदार २०० केन्द्रे, पोलीस अंमलदार ६५८ वाघमारे यांनी केली आहे.

मा. पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने

( प्रमोद खोपीकर )

वरिष्ठ पोलीस निरीक्षक

पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे

